
# पुण्याची हिरवाई

केतकी घाटे
९८२२६५९८०४, ऑयकॉस, ketaki@oikos.in



रस्त्याकडेची हिरवाई (फोटो सौजन्य : श्री. शिरीष घाटे)

**पुण्यातील हिरवाई वाढली किंवा नाही या चर्चेपेक्षा त्या हिरवाईचा पुण्याच्या हवामानावर काय परिणाम झाला, हे महत्त्वाचं नाही काय?**

५ जून आला तसा दर वर्षीप्रमाणे एका पत्रकाराचा फोनही आला. 'पुण्याच्या हिरवाईविषयी तुमचं मत काय? गेल्या ५० वर्षात पुण्यातली झाडी वाढली की कमी झाली, त्याचे परिणाम काय?' वगैरे वगैरे....खरं तर गेल्या ५० वर्षातल्या बदलाविषयी माझ्यासारख्या तिशीतल्या व्यक्तीने मत प्रदर्शन करणं काही फार योग्य नाही. पण तरीदेखील मी त्याला म्हटलं, 'झाडी वाढली की नाही हे कदाचित नक्की सांगणं कठीण आहे, पण चर्चा मात्र नक्कीच वाढली आहे'... आणि खरं तर चर्चा वाढल्यामुळे असेल कदाचित पण झाडीही निश्चित वाढली आहे. यावर लगेचच त्या पत्रकाराने मला 'कुठली झाडे वाढली आहे, कुठल्या भागात इ.' टेक्निकल प्रश्न विचारायला सुरुवात केली आणि चर्चेचा सूरच बदलला. मी त्याला इंगळहळ्ळीकरांचा फोन नंबर दिला, म्हटलं तुम्हाला ह्यांच्याकडे अगदी जाती, उपजातींपासून, संख्या, स्थळांपर्यंत सगळी इत्यंभूत माहिती मिळेल... त्याने आनंदून फोन बंद केला.

मला गंमत वाटते की पुण्यातील हिरवाई वाढली किंवा नाही या चर्चेपेक्षा त्या हिरवाईचा पुण्याच्या हवामानावर काय परिणाम झाला, हे महत्त्वाचं नाही काय? गेल्या काही वर्षात काही टक्के झाडी वाढली म्हणून केवळ आनंदून जाण्यापेक्षा, ती वाढ झाली तरीही पुण्याची तापमान वाढ त्रासदायक होते आहे ही काळजी करण्याची गोष्ट नाही काय? पुण्याची

शहरवाढ, इथली हिरवाई, इथलं सूक्ष्म हवामान, इथलं पर्यावरण, माती-पाणी या सगळ्याची सांगड घालून आपण एका आरोग्यदायी शहराकरता आखणी करू शकतो का?

खरं तर, पुण्याचे पूर्वीचे फोटो पाहिले तर जाणवतं की पुण्यात झाडांची दाटी अशी काहीच फारशी नव्हती. होते ते मोकळे भाग, रस्ते, रस्त्यांच्या बाजूची वडासारख्या झाडांची ओळ. नदी, नदीकाठची झाडी, झाडी कमी असूनही तापमान मात्र थंड होते. हळू- हळू जसं जसं बांधकाम वाढू लागले तसं तसे लोक, म.न.पा वृक्ष लागवड करत होते. परंतु हे प्रमाण लवकरच व्यस्त होत गेलं. रस्ते - बांधकाम इतकं झपाट्यानं वाढलं, वाढतंय, इतकं मोठ्ठ्या प्रमाणात वाढतंय की झाडं कितीही लावली तरी ती पुरी पडत नाहीएत. याचे मुख्य कारण म्हणजे - Heat island effect. एकत्र, जवळ जवळ, एकसंघ बांधकाम असलेल्या ठिकाणी सूर्याची किरणं, उष्मा शोषून घेण्यासाठी काहीही शिल्लक राहत नाही आणि ही सगळी किरणं/ उष्मा हवेत परावर्तित (radiate) होतो आणि त्या ठिकाणचं तापमान वाढतं. उष्मा शोषण्यासाठी गरजेचे असतात नैसर्गिक प्रदेश, मोकळे भाग, झाडांसारखे नैसर्गिक घटक. तेच नाहीसे झाल्याने उष्मा एकाच ठिकाणी केंद्रित होऊन island effect तयार होतो. पूर्वी जेव्हा शहरात वृक्षांची सावली नव्हती तेव्हा गवताळ प्रदेश होते, खुरटी झुडपं हेच उष्मा शोषून घेण्याच काम करत होते. किंबहुना बांधकाम अत्यंत कमी असल्याने परावर्तन होऊन उष्मा तयार होण्याच प्रमाणच फारसं नव्हतं. पर्यायाने शहर थंड होतं. परंतु आता ज्या प्रमाणात बांधकाम वाढतंय त्यामुळे वाढणारा उष्मा एवढा प्रचंड आहे की तो केवळ वृक्ष लावून कमी होणारा नव्हे. त्याबरोबरीने बांधकामासाठी योग्य साहित्याच्या वापरापासून ते शहर नियोजनापर्यंत अनेक गोष्टी करणं शक्य आहे, गरजेचं आहे. अन्यथा तापमान वाढ त्रासदायक ठरतच राहणार.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, पुण्यातली हिरवाई ही केवळ झाडांची टक्केवारी म्हणून बघणं अपुरं वाटतं पुण्यातली झाडांची संख्या वाढणं हे निश्चितच अभिमानास्पद आहेच परंतु विशाल दृष्टिकोनातून बघता या हिरवाईचा इथल्या हवामानाशी, पर्यावरणाशी, नागरिकांच्या आरोग्याशी संबंध साधणं जास्त योग्य वाटतं, holistic वाटतं.

याकरता वेगवेगळ्या स्तरांवर काम करता येईल / काम करणं गरजेचं आहे -

१) धोरणात्मक बदल ( योजना) (Policy level planning / decisions ) शहरातील मोकळ्या जागांच्या टक्केवारीत बदल / वाढ, (जैव विविधता वने), Biodiversity Park, Urban Forestry इ. सारख्या गोष्टींकरता आरक्षण, ओढे, नद्यांकाठच्या विशिष्ट झाडीला आरक्षण - संरक्षण इ. बरोबरीने पर्यावरणपूरक शहर नियोजनही गरजेचे ज्यात इको हाऊसिंग सारख्या अनेक नवीन संकल्पना महत्त्वाच्या.

२) महानगरपालिका - वृक्ष लागवडीकरता शहराचा एकत्रित विचार, वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी वृक्ष संवर्धन कायद्याची कडक अंमलबजावणी, वृक्ष - वनस्पती संवर्धन जागृतीकरता विविध उपक्रम, आरक्षित जागांचं योग्य व्यवस्थापन व देखरेख इ.

३) संस्था / वैयक्तिक स्तर - घराभोवती वृक्ष लागवड, मोकळ्या जागांना संरक्षण, कमीत कमी बांधकाम, paving असणाऱ्या भागांचे आयोजन

**गाजर गवत हटवा, आपली जमीन वाचवा** - कुसुम घाटणेकर

यामुळे विविध प्रकारच्या लागवडीला संधी.

या सगळ्यात 'वृक्ष संवर्धन समिती' महत्वाचे काम करू शकते. वृक्ष संवर्धन समिती (पुणे ट्री अथॉरिटी) ही 'महाराष्ट्र वृक्ष संवर्धन कायदा १९७५' अन्वयार्थ काम करते. हा कायदा अस्तित्त्वात का आला तर वाढत्या शहरीकरणात वृक्षांना संरक्षण मिळावं म्हणून. वृक्षतोडीवर नियंत्रण असण्यासाठी तर या कायद्यात महत्त्वाची तरतूद आहे. punecorporation.org या संकेतस्थळावर या कायद्याची थोडक्यात माहिती दिलेली आहे. काही त्रुटी वगळता कायद्याची रचना उत्तमच आहे. अभाव आहे त्याच्या अवलंबनाचा. या कायद्याच्या अवलंबनामधे वृक्ष संवर्धन समितीबरोबर उद्यान विभागाचा अत्यंत महत्त्वाचा कार्यभाग आहे. वृक्ष अधिकारी, उद्यान विभागातील इतर अधिकारी व वृक्ष संवर्धन समितीतील ३० सदस्य ज्यात १५ कार्यवाही नगरसेवक व १५ सूचित तज्ञ (nominated) असतात. या सगळ्यांची महिन्यातून एकदा बैठक होते. या बैठकीत मुख्यत: महिन्याभरात आलेल्या वृक्षतोडीकरताच्या अर्जांवर निर्णय घेतला जातो. इथे तज्ञांचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. एखाद्या वृक्षाचे महत्त्व काय? त्याची जागा कुठे आहे? त्याची तोड थांबवायची असेल तर त्याच्या आजूबाजूच्या परिस्थितीत काही बदल सुचवता येतो का? उदा. बांधकामात काही बारीकसा बदल करून वृक्ष वाचवता येऊ शकतो किंवा तोडणे अपरिहार्य असल्यास निदान तो वृक्ष योग्य ठिकाणी पुनर्रोपित करता येऊ शकतो का? इ. अनेक बाबींचा विचार करून एखादा तज्ञ त्यावर योग्य असा निर्णय देऊ शकतो. एखादा अत्यंत दुर्मिळ वृक्ष असल्यास तोडीकरता परवानगी न देण्याचा अधिकारही या समितीला असतो. परंतु याकरता या समितीवर असणारे १५ तज्ञ हे खरोखर वनस्पती शास्त्र, स्थापत्यशास्त्र (architecture), शहररचना, (town planning), बागकामशास्त्र (horticulture) इ. विषयातील 'अनुभवी', 'पदवीधारक' असायला हवेत. ते केवळ वृक्षप्रेमी असून भागत नाही. या समितीची रचना जर हा विचार करुन केली तर समितीच्या इतर उद्दिष्टांचाही अधिक योग्य पध्दतीने विचार होऊन कायद्याची उत्तम अंमलबजावणी होऊ शकेल.

सध्यादेखील ही समिती वृक्षतोडीच्या निर्णयांव्यतिरिक्त वृक्षगणना, झाडांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध प्रदर्शनांचे आयोजन, पुनर्रोपण, रोपवाटिका इ. इतरही काही घटकांवर काम करत आहे. परंतु यातल्या काही गोष्टी अनेक वर्ष एकाच पध्दतीने चालू आहेत. यात अनेक बदल करता येणं शक्य आहे. वृक्ष लागवड, हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, त्याचा विचार शास्त्रशुध्द तसेच सौंदर्य दृष्टीने केल्यास आधी नमूद केल्याप्रमाणे आपण आपल्या शहरास निश्चितच वेगळे रूप देऊ शकू. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेलच बरोबरीने इथल्या पर्यावरणावर, माणसाच्या आरोग्यावरही त्याचा प्रभाव पडू शकेल. परंतु या सर्व गोष्टींचा आधी शहराच्या पातळीवर विचार व्हायला हवा. शहराच्या आखणीचा किंवा शहराच्या विविध घटकातील वृक्ष लागवडीचा प्रत्येकी वापरानुसार proactively विचार व्हायला हवा, आखणी व्हायला हवी. वरील सर्व बाबी लक्षात येता, जर, पुण्याची, नवीन विकसित होणाऱ्या भागांची आखणी केली, तर 'पुण्यातील हिरवाई'चं महत्त्व खऱ्या अर्थानी खुलेल!

**सुंदर माझा निवारा, दारी वृक्षांचा पहारा** - अनघा चित्रे